सी.एन.आर.नं.-एम.एच.एन.बी.०९-००००१४-२०१८
सं.फौ.ख.क्र. १/२०१८
शासन – वि- अंबालाल भगवान ठाकरे
नि.क्र. १० पुढे सुरु

## न्या य नि र्ण य

(घोषित दिनांक १६-११-२०१८)

१. कलम ११६ महाराष्ट्र कायदाच्या तरतुदी (यानंतर महाराष्ट्र दारुबंदी कायदा यास **दारुबंदी कायदा** असे पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी संबोधण्यात येईल) तसेच प्रकरण २१ फौजदारी प्रक्रिया संहिताचे तरतुदी (यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यास **फौ.प्र.सं**. असे पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी संबोधण्यात येईल) लक्षात घेउन आरोपी विरोधात कलम ६५ ई दारुबंदी कायदा अंतर्गत आरोपांचा तपशिल निशाणी – १० वर संक्षिप्त फौजदारी खटला ठेवून त्यास तो वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व खटल्याची मागणी केली त्याविषयीचे त्याचे प्रतिकथन सदरचे निशाणी वर नोंदविण्यात आले. अभियोग पक्षातर्फे आरोपी विरोधात सदरचा गुन्हा सिध्द करण्यासाठी तीन साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीचे विरोधात आलेला पुरावा कलम ३१३ फौ.प्र.सं. त्यास वाचुन दाखविण्यात आला व त्यावर त्याचे स्पष्टीकरण नोंदविण्यात आले.

२. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला तसेच आरोपी वकील श्री. आर.आर. मगरे यांचा सुध्दा युक्तीवाद ऐकला.

३. अभियोग पक्षाचे प्रकरण लक्षात घेता खटल्यात खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष हे खालील कारणमिमांसेसह नोंदविलेली आहेत–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यातून एका प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर मादक द्रव्य (Intoxicant– Illicit country liquor) मिळून आल्याचे सिध्द केले काय ? | नकारार्थी |
| २ | आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

अभियोग पक्षाने आरोपीचे विरोधात त्याने केलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार नामे अधिकार राजेंद्र बि-हाडे (अभियोग पक्ष साक्षीदार – १) तपासी अधिकारी, भबुता गुलाब पाडवी (अ. प. सा. – २)

घटनास्थळ व जप्तीपंच आणि कमलसिंग जाधव(अ. प. सा. – ३) फिर्यादी असे एकूण तीन साक्षीदार तपासले. प्रस्तुतचे प्रकरणात पोलिस ठाणे अंमलदार अधिकारी, पोलिस स्टेशन, तळोदा यांनी जप्त मादक द्रव्याचा नमुना रासायनिक पृथ्थकरण अहवाल न्यायालयाचे अभिलेखावर सादर केला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी – १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला.

**मुद्दा क्र. १ चे बाबत** :

५. कमलसिंग (अ.प.सा.– ३) फिर्यादी, याचे सरतपासाचे पुराव्यात असे आले आहे की, दि. १६–०६–२०१७ रोजी तो तळोदा पोलिस स्टेशन येथे पोलिस शिपाई या पदावर कार्यरत असतांना सदरचे दिवशी श्री. राजेंद्र बि–हाडे, अ.स.ई. यांना गुप्त बातमी मिळाली की, दसवड गावी आरोपी अंबालाल भगवान ठाकरे हा गा.ह.भ. दारुची विक्री करीत आहे. ते श्री. बि–हाडे अ.स.ई. यांचे मार्गदर्शनानुसार तळोदा पोलिस स्टेशनला दोन पंचांना बोलविले व त्यांना बातमीची हकीकत सांगितल्यानंतर ते पंच म्हणून हजर राहण्यास तयार झाले. तो, दोन पंच, श्री.बि–हाडे व इतर पोलिस कर्मचारी वर्ग असे सर्व मिळून ते बामीच्या ठिकाणी गेले. ते दसवड गावात एका घराच्या आडोशाला गेले असता, आरोपी हा एक प्लॅस्टीक कॅन घेवून बसलेला दिसला. त्यांना दारुबंदी संशय आल्याने त्यांनी त्याला जागेवरच पकडले. त्यांनी त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव अंबालाल भगवान ठाकरे असे सांगितले. त्यांना त्याच्या ताब्यातून ४० लिटर गा.ह.भ. ची एका प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये मिळून आली. त्याने सदर मुद्देमालाचा जप्ती पंचनामा दोन पंचासमक्ष तयार करुन मुद्देमाल जप्त केला व जप्त मुद्देमालातून रासायनिक पृथ्थकरणासाठी १८० मि.ली. नमुना एका काचेच्या शिशीत घेण्यात आला होता व ती शिशी त्याचे व पंचांच्या स्वाक्षरीचे कागदी लेबल लावून सिलबंद करण्यात आली. त्याने फिर्याद, त्यातील मजकुर व स्वाक्ष–या ओळखल्या **नि. २२** तसेच त्याने आरोपीस न्यायालयात ओळखले. त्याने उलटतपासात त्याने नाकारले की, आरोपीच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल मिळून आला नव्हता.

६. राजेंद्र (अ.प.सा.–१) तपासी अधिकारी, यांचे सरतपासाच्या पुराव्यात साक्षीदार कमलसिंग (अ.प.सा.–३) यांच्या सरतपासातील पुराव्यासारखा पुरावा आलेला आहे. तसेच त्याच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याने दोन पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातून मिळोल्या मुद्देमालाचा जप्तीपंचनामा तयार करुन मुद्देमाल जप्त केला व जप्त मुद्देमालातून रासायनिक पृथ्थकरणासाठी १८० मि.ली. नमुना एका काचेच्या शिशीत घेण्यात आला होता व उर्वरित मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला. त्याने जप्तीपंचनामा, त्यातील मजकुर व स्वाक्ष–या ओळखल्या **नि. १८**. श्री. कमलसिंग यांचे फिर्यादीवरुन गु.र.नं. १२८/२०१७ चा तपास त्याचेकडे देण्यात आला व त्याने साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्यानुसार नोंदवले. त्याने मुद्देमाल पावती, त्यातील मजकूर व त्यावरील स्वाक्षरी ओळखली **नि. १९**. तसेच त्याच्या पुराव्यात असे आले आहे की, प्रस्तुत प्रकरणातील नमुना रासायनिक पृथ्थकरण अहवाल अप्राप्त आहे व त्याने आरोपीस न्यायालयात ओळखले. त्याने उलटतपासात नाकारले की, बातमीच्या ठिकाणी आरोपी हा प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये गा.ह.भ.

ची दारु विक्री करताना मिळून आला नव्हता व त्याने साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला नाहीत. तसेच त्याने नाकारले की, सबळ पुरावा नसतांना आरोपीचे विरोधात दोषारोपपत्र न्यायालयात सादर केलेले आहे.

७. भबुता (अ.प.सा.–२) घटनास्थळ व जप्तीपंच हा अभियोग पक्षास फितूर झाला व त्यास फितूर साक्षीदार म्हणून घोषित केल्यानंतर ही त्याने नाकारले की, दि. १६–०६–२०१७ रोजी पोलिसांनी त्याला दसवड गावात घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी बोलवले होते व पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून त्याचे समक्ष एका प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर गा.ह.भ. ची दारु मिळून आली व ती जप्त करण्यात आली तसेच जप्त मुद्देमालातून १८० मि.ली. नमुना रासायनिक पृथ्थकरणासाठी एका काचेच्या शिशीत घेण्यात आली व ती शिशी त्या स्वाक्षरीचे कागदी लेबल लावून सिलबंद करण्यात आली.

८. अभियोग पक्षाचा आरोपीचे विरोधात असा आरोप आहे की, आरोपीचे ताब्यातून एका प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर मादक द्रव्य (Intoxicant– Illicit country liquor) मिळून आले त्यामुळे त्याने कलम ६५ ई दारुबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा केलेला आहे. पोलिस ठाणे अंमलदार अधिकारी, पोलिस स्टेशन, तळोदा यांनी जप्त मादक द्रव्य याचा नमुना रासायनिक पृथ्थकरण अहवाल न्यायालयाचे अभिलेखावर सादर केला नाही. त्यामुळे आरोपीचे ताब्यातून जे द्रव्य हे जप्त करण्यात आले होते ते द्रव्य हे मादक द्रव्य होते असे सिध्द होणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ व जप्तीपंच भबुता (अ.प.सा.–२) हा अभियोग पक्षास फितुर झाला व त्यास फितुर साक्षीदार म्हणून घोषित केल्यानंतर ही त्याने नाकारले की, दि. १६–०६–२०१७ रोजी पोलिसांनी त्याला दसवड गावात घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी बोलवले होते व पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून त्याचे समक्ष एका प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर गा.ह.भ. ची दारु मिळून आली व ती जप्त करण्यात आली तसेच जप्त मुद्देमालातून १८० मि.ली. नमुना रासायनिक पृथ्थकरणासाठी एका काचेच्या शिशीत घेण्यात आली व ती शिशी त्या स्वाक्षरीचे कागदी लेबल लावून सिलबंद करण्यात आली. तसेच तपासी अधिकारी याचे पुराव्यात असे आले आहे की, नमुना रासायनिक पृथ्थकरण अहवाल अप्राप्त आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात नमुना शिशी रासायनिक परिक्षणासाठी पाठविल्याविषयीचा कोणताही दस्तऐवज नाही तसेच नमुना वाहकाचा जबाब सुध्दा नाही. आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल हे मादक द्रव्य होते याविषयीचा कोणताही ठोस पुरावा न्यायालयाचे अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने कलम ६५ ई दारुबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा केला आहे हे सिध्द होवू शकलेले नाही. त्यामुळे आरोपी हा कलम ६५ ई दारुबंदी कायदयाअंतर्गत निर्दोष आहे. या कारणास्तव मी मुद्दा क्र. १ याचे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीस फौ.प्र.सं. कलम २५५ (१) नुसार कलम ६५ (ई) दारुबंदी कायदया अंतर्गत गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक तसेच जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. फौ.प्र.सं. कलम ४३७–अ या कलमा अंतर्गत सदर खटल्यात आरोपीने रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तिक जात मुचलका व नव्याने जामीन बंधपत्र दयावे.

४. न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषित करण्यात आला.

तळोदा (मा. गो. मोरे)

दिनांक : १६–११–२०१८ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तळोदा